दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९९ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# देशभरातील ट्रक आणि टँकर चालकांचा संप अखेर मागे

## ट्रक चालकांना कामावर येण्याचं आवाहन

**मुंबई–**ट्रक आणि टँकर चालकांचा संप अखेर मागे घेण्यात आला आहे. केंद्रीय गृह मंत्रालय आणि ट्रान्सपोर्ट संघटनांची बैठक संपली आहे. हिट अँड रनचा कायदा लागू झालेला नाहीय. ट्रान्सपोर्ट संघटनांनी चालकांना कामावर येण्याचे आवाहन केले आहे. सरकारसोबतच्या बैठकीनंतर हा संप मागे घेण्यात आला आहे. मागील दोन दिवसांपासून राज्यासह देशभरात सुरू असलेल्या संपावर तोडगा निघाला आहे.

केंद्रीय गृह सचिवांसोबत ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसचे शिष्टमंडळाची चर्चा झाली. या चर्चेअंती नवीन मोटर वाहन कायद्यातील शिक्षा आणि दंडाच्या नव्या तरतुदी लागू होणार नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता मालवाहतूकदार, टँकर चालकांचा संप मागे घेतला जाणार आहे. बुधवारपासून मालवाहतूक सुरळीतपणे सुरू होईल, असा अंदाज आहे. ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसनेह चालकांना वाहतूक तात्काळ सुरू करण्याचे आवाहन केले आहे.मागील दोन दिवसांपासून मालवाहतूकदार, टँकरचालकांचा संप



सुरू असल्याने राज्यासह अनेक ठिकाणी इंधनापासून ते भाजीपाला, अत्यावश्यक गोष्टींचा पुरवठा थांबला होता. देशभरात ट्रक चालकांनी संप पुकारल्याने पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याचे चित्र होते. अनेक ठिकाणी पेट्रोलपंप इंधनाअभावी ओस पडले होते. तर, पेट्रोल भरून घेण्यासाठी ठिकठिकाणी पेट्रोल पंपावर रांगाच रांगा लागल्या होत्या. या संपाची धग तीव्र होत असताना दुसरीकडे केंद्र सरकारने मालवाहतूकदारांच्या संघटनांना चर्चेसाठी बोलावले. या चर्चेत संपाबाबत अखेर तोडगा काढण्यात आला.ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसचे बल मलकित सिंग यांनी म्हटले की, गृहसचिवांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. कलम १०६(२) अद्याप लागू करण्यात आलेले नसल्याचे त्यांनी म्हटले. कायद्याची अंमलबजावणी होणार नाही असेही आश्वासन गृहसचिवांनी दिले असल्याचे सिंग यांनी म्हटले. या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न सरकारने केल्यास त्यांना आमच्या मृतदेहांवर जावे लागेल असा इशाराही त्यांनी दिला.ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट काँग्रेसच्या बैठकीबाबत केंद्रीय गृहसचिव अजय भल्ला म्हणाले, आम्ही आज ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट काँग्रेसच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. सरकारला सांगायचे आहे की नवीन कायदे आणि तरतुदी अद्याप लागू झालेल्या नाहीत, भारतीय न्यायिक संहितेच्या कलम १०६(२) ला लागू करण्यापूर्वी, ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट काँग्रेसशी सल्लामसलत केल्यानंतरच निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी म्हटले.

# चरूर गावातील विद्यार्थ्यांनी दिली मॅजिक उपक्रमाला भेट

**चिमूर । प्रतिनिधी**

भद्रावती तालुक्यातील चरूर या गावातील शालेय विद्यार्थ्यांनी भिशी जवळील पुयारदंड येथील डॉ. रमेशकुमार गजबे शिक्षा संकुल येथे सुरू असलेल्या मॅजिक उपक्रमाला दिनांक १ जानेवारी २०२३ रोजी भेट दिली. विद्यार्थ्यांनी एकप्रकारे मावळत्या २०२३ या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि २०२४ या वर्षाचे स्वागत करण्यासाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करून एक वेगळा पायंडा रोवला आहे, असे मत मॅजिक उपक्रमाचे मुख्य संयोजक वाल्मीक नन्नावरे यांनी व्यक्त केले. चरूर या गावात नुकताच आदिवासी माना जमात व ग्रामवासी यांच्या वतीने नागदिवाळी उत्सव साजरा करण्यात आला. यानंतर गावातील शालेय विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीचे आयोजन करून भिसी येथे सुरू असलेल्या मॅजिक उपक्रमाला भेट दिली. त्यामुळे वर्षाच्या शेवटच्या दिवशी रम–रमा–




पार्टी यात गुंतलेल्या तरुणाईपुढे या विद्यार्थ्यांनी आदर्श निर्माण केला आहे. विद्यार्थ्यांनी मॅजिकला भेट दिल्यानंतर त्यांनी मॅजिक उपक्रमाविषयी संपूर्ण माहिती जाणून घेतली मॅजिक उपक्रम कसा चालतो. येथील विद्यार्थी नेमके काय करतात. त्यांची दैनंदिनी कशी असते. मॅजिक परिवाराच्या भविष्यातील नेमक्या कोणत्या योजना आहेत. अशी इत्यंभूत माहिती त्यांनी जाणून घेतली. त्यानंतर मॅजिकचे माजी विद्यार्थी आणि पोलीस विभागात कार्यरत असलेले ज्ञानेश्वर जांभुळे यांनी उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे उत्तम मार्गदर्शन केले. यानंतर त्यांनी मॅजिकला अन्नधान्य व आर्थिक स्वरूपात भरघोस मदत सुद्धा केली. याप्रसंगी आदिवासी विद्यार्थी युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांभूळे, ग्रामशाखेचे अमोल दडमल व गावातील नागरिक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# भगवान बुद्धाच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्या समाजकंटकावर तत्काळ कारवाई करा

### प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे यांची मागणी

**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील प्रयास सखी मंचच्या वतीने मंगळवार, २ जानेवारी रोजी भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्या समाजकंटकावर तत्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

भद्रावती शहरातील ऐतिहासिक बुद्ध लेणी टेकडीवरील भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीची अज्ञात समाजकंटकांकडून विटंबना केल्याची घटना सोमवार, १ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली.या प्रकरणातील दोषींना तत्काळ अटक मागणी प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे यांनी केली आहे.या ऐतिहासिक बुद्ध लेणी टेकडीवर भगवान गौतम बुद्धाची मूर्ती होती. या मूर्तीची विटंबना झाल्याची घटना उघडकीस आली. अशा प्रकारच्या घटनांमुळे जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणात तत्काळ कारवाई करून दोषींना अटक करने आवश्यक आहे.प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे यांनी शिष्टमंडळासह ठाणेदार आसिफराजा शेख यांची पोलिस ठाण्यात भेट घेतली व चर्चा करून निवेदन




दिले.यावेळी प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे, सुषमा सावे, अमीना बेगम, पुष्पा रामटेके, माधुरी चोखांद्रे, सुधा उरकुडे, गुलशन बानो, जकरून बानो शेख, सुनीता घिवे, शारदा झाडे, वैशाली भालशंकर, शारदा फुलझले, छाया पाटील, प्रीती बोत्रा, विमल इंगोले, शुभश्री किन्हेकर, शोभा माकोडे, आरती पुसाटे, नेहा कुम्मरवार, खुशबू मेश्राम, स्वाती गंगाधरे, वैष्णवी मडावी, कुमुदिनी हनुमंते, पायल वाडगुरे व मोठया संख्येत महिला उपस्थित होत्या.

# पीपीएल पुलगावने दुसऱ्यांदा सीएडी क्रिकेट लीग जिंकली




**पुलगाव । प्रतिनिधी**

केंद्रीय दारूगोळा भांडार प्रशासन आयोजित सि. ए. डी.क्रिकेट लीगचे उद्घाटन २६ डिसेंबर रोजी ए. पी. एस.मैदान, केंद्रीय दारूगोळा भांडार कॅम्प, पुलगाव येथे झाले यात पीपीएल पुलगाव संघाने सलग दुसऱ्यांदा सीएडी क्रिकेट लीग जिंकली. ज्यामध्ये सीएडी पुलगावच्या सीमा भागातील गाव संघांना आमंत्रित करण्यात आले होते.या स्पर्धेत एकूण १६ संघ सहभागी झाले होते. ज्याची दोन गटात विभागणी करण्यात आली होती. एका गटात सीएडीच्या सर्व विभागांचे संघ होते आणि ब गटात सीएडी सीमेवरच्या गावातील संघ होते. अ गटातील एओसी संघ आणि ब गटातील पीपीएल पुलगाव संघाने आपापल्या गटातील सर्व संघांना पराभूत करून अंतिम फेरी गाठण्यात यश मिळविले.अंतिम फेरीत पीपीएल पुलगाव संघाने एओसी संघाला १०२ धावांचे लक्ष्य दिले होते मात्र ए.ओ.सी. संघ हा सामना १२ धावांनी हरला आणि पीपीएल पुलगाव संघाने सलग दुसऱ्यांदा सीएडी क्रिकेट लीगवर कब्जा केला.बक्षीस वितरण समारंभ केंद्रीय दारूगोळा भांडारचे कमांडर ब्रिगेडियर कौशलेश पंघल यांच्या हस्ते पार पडला.यामध्ये सि. ए. डी.क्रिकेट लीगची विजेती ट्रॉफी पी. पी. एल.पुलगाव संघाला सुपूर्द करण्यात आली. अंतिम सामन्यात ३ बळी आणि ३१ धावा करणाऱ्या ए. ओ. सि.संघाच्या हवालदार योगेशला सामनावीराचा किताब देण्यात आला. या स्पर्धेत १०७ धावा आणि ६ बळी घेणारा पीपीएल पुलगावच्या भरत नागपालला मालिकावीराचा किताब देण्यात आला. लीगच्या बोनस वितरण समारंभाला प्रशासकीय अधिकाऱ्यांसह सर्व अधिकारी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीमध्ये सीसीएमई मेजर डागर , अनिल गावंडे, विक्रम झाडे, निलेश शेंडे, बलजीत शर्मा, ओम बाबू, सुभेदार पिलानी, वाघ, नरसिंह यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.



# वाहतूकदारांनी बदलला संपाचा गिअर

**ननुकताच संसदेत मंजूर झालेल्या भारतीय न्यायिक संहिता २०२३ या कायद्यानुसार हिट अँड रन प्रकरणात दोषी चालकाला ७ लाख रुपये दंड आणि १० वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाची तरतूद करण्यात आलेली आहे. सध्या भारतीय दंडविधानाच्या (कलम २७९) निष्काळजीपणे वाहन चालविणे, (कलम ३०४-अ) निष्काजीने मृत्यू होणे आणि (कलम ३३८) दुसऱ्याचा जीव धोक्यात घालणे अंतर्गत हिट अँड रन प्रकरणातील दोषी वाहन चालकाला सध्या २ वर्षाच्या कालावासाची तरतूद आहे. ताज्या दुरुस्तीनंतर कलम १०४ (२) अंतर्गत एखादा चालक अपघातानंतर घटनास्थळावरून पळून गेला किंवा त्याने पोलीस किंवा दंडाधिकाऱ्यांना अपघाताची माहिती दिली नाही तर त्याला सध्याच्या पाचपट तुरुंगवास व जबर दंड होणार आहे.**




काल मराठी प्राध्यापक परिषदेची विशेष बैठक नागपूर येथे परिषदेचे भावी संमेलनाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांच्या नागपूर येथील निवासस्थानी होती. त्यानिमित्ताने नागपूरला जायचा योग आला. गोंडवाना विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ या दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापक परीषदेचे कार्यकारिणी सदस्य या सभेला उपस्थित राहणार होते. त्यानिमित्ताने आमचे मित्र डॉ. सुदर्शन दिवसे यांच्यासोबत कारने प्रवास केला. महामार्गावर आज सर्वत्र वाहनांचा शुकशुकाट होता. नेहमीसारखी वर्दळ नव्हती. एखादा दुसरे अपवाद वगळता रस्ता खाली होता. जणूकाही संचारबंदी लागली आहे की काय असा भास निर्माण झाला. परतीच्या प्रवासामध्ये नागपूर येथील मध्यवर्ती बस स्थानकावर गेलो असता तेथे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात उसळलेली गर्दी व डेपोतून निघणाऱ्या बसेसचा तुटवडा होता. यामुळे अनेकांना आपल्या गावी जाताना मोठा आटापिटा करावा लागला. बऱ्याच वर्षानंतर असे गैरसोयीचे वातावरण बघायला मिळाले. चौकशी केली असता या समस्येला वाहतूकदारांचा सुरू असलेला संप कारणीभूत असल्याचे बोलले गेले. ती समस्या काय आहे हे समजून घेण्याचा हा प्रयत्न.

रस्ते अपघातानंतर वाहन चालक पळून गेला तर (हिट अँड रन) अंतर्गत त्याला कठोर शिक्षेची तरतूद असलेल्या नव्या कायद्याच्या विरोधात देशभरातील वाहतूकदार आणि ट्रकचालकांनी काल सोमवारपासून जो संप पुकारला त्या संपाला जनसामान्यातून मोठ्या प्रमाणामध्ये प्रतिसाद मिळत आहे. या नव्या कायद्याबद्दल वाहनचालकांमध्ये कमालीची नाराजी असून ती त्यांच्या रस्त्यावरून उतरलेल्या आक्रमकतेतून लक्षात येते. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडासह उत्तर महाराष्ट्रातही या संपाचे पडसाद मोठ्या प्रमाणात उमटलेले दिसत आहे. विदर्भातील जवळपास पंधरा हजारांच्यावर ट्रक व टँकर चालकांनी विदर्भातील महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले. या आंदोलनामुळे महामार्गावर वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण झाली असून रस्त्यावर वाहने अल्प प्रमाणात धावताना दिसत आहे. जणूकाही महामार्गावर संचारबंदी लागली आहे की काय असे चित्र बघावयास मिळते. तुरळक प्रमाणामध्ये वाहने रस्त्यावरून धावत आहे. नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीला समोरे जावे लागत आहे आणि जावे लागणार आहे.

नवा कायदा सुरू करण्यामध्ये सरकारचा हेतू जरी चांगला असला तरी त्याची जनसामान्यासमोर मांडणी करण्यात, तो समजावून सांगण्यात शासन कुठेतरी कमी पडलेले असावे असे वाटते. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सर्वात मोठे योगदान जर कुठल्या क्षेत्राचे असेल तर ते वाहतूक क्षेत्राचे आहे. सध्या वाहतूक क्षेत्र आणि वाहन चालकांचे देशाच्या विकासात योगदान लक्षात घेता हा संप लवकरात लवकर मिटायला हवा असे वाटायला लागले आहे. कुठल्या वाहनचालकाच्या हातून अपघात झाल्यास त्याला होणारी १० वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा प्रत्यक्षात जर अस्तित्वात आली तर लाखो वाहनचालकांच्या कुटुंबीयांच्या रोजीरोटीचा प्रश्न उभा होऊ शकतो. त्यामुळे या नव्या कायद्याबद्दल मोठ्या प्रमाणामध्ये धास्ती निर्माण झालेली आहे.

कायदा हा लोकांच्या हितासाठी असला तरीही मानवतावादी दृष्टीकोनातून दुसऱ्या बाजूचा विचार केला जाणे आवश्यक आहे. सामान्य लोकांच्या मनामध्ये वाहन चालकाकडून होणाऱ्या अपघाता संदर्भात जे गैरसमज आहेत तेही दूर होणे आवश्यक आहे. बऱ्याचदा दोन वाहनांची टक्कर झाल्यानंतर अपघात होतो. त्यात जे वाहन आकाराने मोठे आहे त्याच वाहनचालकांना दोष देऊन समाजातील लोक मोकळे होतात. त्यात खरा दोषी कोण आहे याकडे बघितले जात नाही. अनेकदा समूहाचे भान सुटल्याने गर्दीतील लोक दोष असो वा नसो त्या मोठ्या वाहन चालकाला चोपतात. मारण्याचाही प्रयत्न करतात. त्यामुळे स्वतःचा जीव वाचविण्यासाठी अनेकदा वाहनचालक पळून जातात. काही स्वतः पोलीस स्टेशनमध्ये जाऊन जमा होतात. एखादा अपघात घडला म्हणजे तो केवळ मोठ्या वाहनामुळेच घडला. असे गृहीत धरून त्यांना कोणत्याही प्रकारचा कसूर नसता दोषी धरणे म्हणजे त्या वाहन चालकावर, त्याच्या प्रामाणिकपणावर बोट दाखविणे होय.जे अन्यायकारक आहे.खरे म्हणजे समाजानेही आता आपली मानसिकता बदलायला पाहिजे.

अनेकदा छोटे वाहन चालक वाहतूक नियमांचे पालन न करता बेशिस्तपणे वाहन चालवितात. त्यांच्या बेशिस्त वाहन चालविण्याला बंधने आली पाहिजे.वाहतुकीदरम्यान रस्त्यावरून चालताना वाहन छोटे असो की मोठे सर्वांनी आता काळजी घेण्याची गरज आहे. कारण हा नवीन कायदा जर अस्तित्वात आला तर या कायद्यानुसार हिट अँड रन प्रकरणात संबंधित दोषी चालकाला ७ लाख रुपयेपर्यंत दंड आणि १० वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाची तरतूद करण्यात आलेली आहे. आता बेजबाबदार व बेशिस्त वाहन पळवणे अंगावर येणारे आहे. यापुढे सतर्क व शिस्तबद्ध पद्धतीनेच नियमांचे काटेकोरपणे पालन करीत वाहन चालवावे लागेल. रस्त्यावरून चालणाऱ्या जीवांची काळजी घ्यावी लागेल. थोड्याही झालेल्या चुकीचे परिणाम स्वतः ड्रायव्हर वाहन चालकासह त्याच्या कुटुंबालाही भोगावे लागणार आहे. रस्त्यावरून कामानिमित्त चालणारा पादचारी असो की कोणीही व्यक्ती असो तो सुरक्षितपणे घरी येईल असे विश्वासमय वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. बेजबाबदार व बेशिस्त वाहन चालकांवर या कायद्यामुळे मोठ्या प्रमाणात जरब बसू शकतो. सावधपणा व सतर्कता महत्त्वाची राहणार आहे. जेणेकरून अपघातासारख्या चुका होऊन कुणालाही प्राणास मुकावे लागणार नाही.

या आंदोलनाची धास्ती सामान्य नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात घेतलेली आहे. पेट्रोल आणि डिझेल हे मानवी जीवनात महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. दळणवळणात व मानवी व्यवहार सुचारू पद्धतीने चालण्यात हे दोन्ही घटक महत्त्वाचे आहे.राज्यातील टँकर चालकांनी पुकारलेल्या या तीन दिवसीय संपामुळे समाजमनामध्ये पेट्रोलची आणि डिझेलची टंचाई निर्माण होऊ शकते असा गैरसमज होऊन भीती निर्माण झालेली आहे. त्यामुळे अनेक पेट्रोल पंपांवर लोकांनी आवश्यकतेपेक्षा मोठ्या प्रमाणात गर्दी केली. परिणामतः अनेक पेट्रोल पंपावरील पेट्रोल डिझेल संपल्यामुळे पंप बंद ठेवण्यात आलेले आहे. टँकर चालक मोठ्या प्रमाणामध्ये या संपात सहभागी असल्याने या संपाचा फटका पेट्रोलपंपांना बसणार अशी शक्यता वर्तवली जात आहे. उद्या गैरसोय होण्यापेक्षा आजच पेट्रोल भरून घ्यावे असे मेसेजही सर्वत्र पसरवले जात असल्याने आपली गैरसोय टाळण्यासाठी अनेक वाहनचालकांनी आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात गरज नसतानाही आपल्या वाहनांमध्ये पेट्रोल भरणे सुरू केले. पेट्रोल, डिझेलचा तुटवडा जाणवणार नाही. नागरिकांनी पेट्रोल पंपावर गर्दी करू नये असे आवाहन पेट्रोल पंपच्या लोकांकडून करण्यात येत असले तरी नागरिक ते मानायला तयार नाही. त्यामुळे पेट्रोल पंपावर लांबच लांब रागा लागल्याचे चित्र पाहायला मिळतं आहे.

# स्त्री शिक्षणाचा भक्कम पाया!

सावित्रीमाई फुले यांचा जन्म आजच्या दिवशी म्हणजेच दि.३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे-पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह- काव्यफुलेमधून दिला-

विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।
तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन।।

म.जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षाच्या होत्या. शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वत: शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि.१ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा!

इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे।।

इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे।।

इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।


ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

काळरात्र गेली। अज्ञान पळाले।।
सर्वे जागे केले। सूर्याने या।।
शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य।।
तेजस्वी अपूर्व। उगवला।।

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणार अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-

स्वामी जोतीबांच्या लागे मी चरणी!
त्यांची गोड वाणी मनी घुमे!!
महार मांगाची करते मी सेवा!
आवडीच्या देवा स्मरूनिया!!

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अपप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह



प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म.फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राम्हण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली।।
ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकूनी घ्या रे।।
ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे।।
मुलाबाळांना आपण शिकवू आपणही शिकू।।
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्म शिकू।।
नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन।।
शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन।।
राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो।।
यशाची आमच्या दुंदभी नगारे झडो।।
'इडा पिडा टळो' या कार्यी भट न पडो।।
असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।।
परंपरेच्या बेड्या तोडुनी शिकण्यासाठी उठा।।

काव्यफुलेच्या माध्यमातून रंजल्या-गांजलेल्या दलित-पीडित समाजाला शिक्षणामृत पाजणाऱ्या राष्ट्रपितामह क्रांतीबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे विचारधन हीच आपली संपत्ती नव्हे का?

प्लेगने बाधीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीमाईंनाच प्लेगची लागण झाली. दि.१० मार्च १८९७ रोजी त्या निर्मिकांकी कायमच्या निद्रिस्त झाल्या.

!! जयंती निमित्त सावित्रीमाईंस व त्यांच्या जनोद्धारक कार्यास विनम्र अभिवादन !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**मो. नं. ७७७५०४१०८६.**

# आद्य क्रांतिकारी शिक्षिका सावित्रीबाई फुले!

माती आणि माता नसती तर काय झाले असते? काहीच उगवले आणि कुणीच जन्मले नसते. माय-मातीच्या जीवघेण्या त्यागावर संपूर्ण विश्वाचा डोलारा उभा आहे. या दोघींचं रुजवणं आणि उगवणं अविरतपणे सुरु आहे, ही आपल्यासाठी मोलाची बाब! जगाच्या आरंभापासून ते अंतापर्यंत जिच्यामुळे सर्वकाही घडून येत असतांना तिच्या नशिबी मात्र नित्य उपेक्षाच! तुम्हाला मला जन्म देणाऱ्या मायनं शेतीचा शोध लावला, सर्वच पुरुषांना शिकवणारी ती आद्य शिक्षिका! स्त्री शक्तींचा इतिहास मोठा देदीप्यमान आहे! आत्तापर्यंत अनेक महान मातांनी आपल्या जीवाचं बलिदान देऊन इथली क्रांतीची मशाल अखंड तेवती ठेवली आहे. याच महान धुरंधर स्त्रियांच्या तजोमय रांगेत सदैव अग्रस्थानी उच्चारले जाणारे नाव म्हणजे आद्य स्त्री शिक्षीका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले! इतिहासातील महान मातांच्या नावांचा उल्लेख झाला की; अंगावर शहारे येतात. आपल्या पोटच्या गोळ्यासाठी स्वतःच्या जीवाची बाजी लावणाऱ्या, अश्यक्य असा गड सर करणाऱ्या हिरकणी या महान मातेची कहाणी जशी मोठ्या सन्मानाने सांगितली जाते तशीच इथला सामान्य माणूस जगला-स्वावलंबी-आत्मभान असणारा झाला पाहिजे यासाठी अहोरात्र झगडून आपले साम्राज्य उभारणाऱ्या राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब, रणरागिणी माता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आणि अन्य शक्तिशाली स्त्रियांचा गौरव नित्य झाला आहे आणि अचंद्रसूर्य होत राहिल!सावित्रीबाई फुले यांचा इतिहास आणि कार्य केवळ एका लेखात लिहून बंदिस्त होणारे नाही. त्यांचा जीवनपट अनंत आव्हाने आणि खडतर वळणांनी भरलेला आहे. या महामानवांची चरित्रे आणि चारित्र्य नीट तपासून पहिले असता, आपण काय करत आहोत? आपल्या भोवताल आणि एकूणच देशाच्या उभारणीत आज आपले योगदान काय? या प्रश्नांची उत्तरे शोधतांना आपले आपल्यालाच हसू आल्याशिवाय राहणार नाही. केवळ नऊ वर्षे वयाच्या सावित्रीबाई तेरा वर्षाच्या ज्योतीराव फुल्यांबरोबर सून म्हणून घरात आल्या. सावित्रीबाईंच्या वडिलांच्या घरी पाटीलकी होती. नेवसे गावचे पाटील असलेले वडील श्री विठ्ठलराव यांनी आपल्या लेकीवर शिक्षणाचे संस्कार रुजवले होते. माहेरावरून येतांना सावित्रीबाई ख्रिश्चन मिशनरींनी दिलेले एक पुस्तक सासरला घेऊन आल्या. अगोदरच वेगळे काहीतरी करण्याचे वेड असलेले त्यांचे पती ज्योतीराव फुले ते पुस्तक वाचून आणखीनच बदलले. त्या काळात सर्वत्र क्रांतिकारी विचारांचे वारे जोरात वहात होते. एकोणिसावे शतक म्हणजे जगभर सुरु असलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता संबंधाने सुरु असलेल्या चळवळी! दुसरीकडे भारतात धर्माचा समाजमनावर खोलवर प्रभाव झाला होता! कट्टर वर्णव्यवस्था, जातीभेद यांनी भारताचा तळ गढूळ झाला होता. समाजव्यवस्थेच्या अनंत चिरकाळ्या झाल्या होत्या. खऱ्या धर्माला ग्लानी आली होती. अनेक शतकापासून चालत आलेला वारकरी संप्रदाय केवळ मंदिरात बंदिस्त झाला होता. यारे यारे लहान थोर हा वारकरी विचार मावळला होता.



ज्ञानोबा-तुकोबांचे अभंग ऐकू येत नव्हते. सगळीकडे भोंदू-बाबांचा सुळसुळाट झाला होता. असे असतांना युवा ज्योतीराव फुले काहीतरी वेगळे करण्याचा विचारात असायचे. सत्यनारायणाची कथा मोठ्या भावभक्तीने ऐकणारा समाज आपल्या घरातील बालविधवा सूनेला सती पाठवायला अथवा तिचे केशवपन करून तिला बंदिस्त कोठडीत टाकायला मागेपुढे पहात नव्हता. आपल्या भोवतालची प्रचंड विषारी विषमता, गरिबी, दारिद्र्य, उपासमार, स्त्रियांचा प्रचंड छळ इत्यादी पाहून ज्योतीराव मनोमन व्यथित व्हायचे! नवविवाहित असतांना प्रेमाच्या गप्पात मशगुल न होता रात्र रात्र याचाच अखंड विचार करत राहायचे. यासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे? हा सवाल त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता.असे विचारांचे वादळ सुरु असतांना सावित्रीबाई पंधरा सोळा वर्षाच्या झाल्या. भोवताल अनेक बाल विधवा, केशवपन केलेल्या, घरात बंदिस्त असणाऱ्या युवा भगिनी पाहून यांच्यासाठी काहीतरी करायला हवे. यांना लिहायला, वाचायला शिकवायला पाहिजे असे ज्योतीरावांना मनोमन वाटायचे, मात्र यांना शिकवायला स्त्री शिक्षिका कुठून आणायची? हा फार मोठा यक्ष प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आणि हा प्रश्न आपल्या घरातूनच सोडवायचे त्यांनी ठरवले. आपली पत्नी सावित्रीबाईंना लिहायला-वाचायला आणि शिकवायला शिकवायचे असे ज्योतीरावांनी ठरवले. हे फार मोठे क्रांतिकारी पाउल होते! चूल आणि मूल विचारसरणीत अडकलेला बुरसटलेला समाज हे स्वीकारेल का? याचा तिळभर विचार न करता ज्योतिबा कामाला लागले आणि त्यांच्या युवा पत्नी सावित्रिबाईंनी त्यांना खंबीर साथ द्यायचे ठरवले! त्यानंतरचा त्या दोघांचा संपूर्ण जीवनपट मोठा क्रांतिकारी ठरला.ज्योतीराव-सावित्रीबाई यांनी १८४८ साली मुलींची पहिली शाळा पुण्यात काढून आपल्या क्रांतीचे रणसिंग फुंकले. अगोदर आपल्या घरातील पाण्याची विहीर सर्व समाजासाठी खुली करून क्रांतिकारी कार्याला ते सामोरे गेलेच होते. मुलींच्या शाळेत जातांना सावित्रीबाईंना कुजलेल्या समाजाने अतोनात छळले. शिव्यांची लाखोली, त्यानंतर शेण, चिखल, सडकी अंडी आणि एवढ्यावरही काम थांबले नाही तेंव्हा चांडाळानी सावित्रीबाईंना अक्षरशः दगड मारले. त्यात सावित्रीबाई रक्तबंबाळ झाल्या. एवढे होऊनही त्यांनी आपले काम थांबवले नाही. अविरतपणे आपले काम करतांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. अंगावरील एका लुगड्याचे दोन तुकडे करून एक अंगावर शेण-चिखल-सडकी अंडी झेलण्यासाठी आणि दुसरे शाळेत गेल्यावर शिकवण्यासाठी वापरले!

शिक्षणाचे काम सुरू असतांना ज्योतीरावाकडून लेखनाचे बाळकडू घेतले आणि एकही दिवस शाळेत न गेलेल्या सावित्रीबाई लेखिका, कवयित्री झाल्या. काव्यफुले (काव्य संग्रह), सुबोध रत्नाकर, सावित्रीबाईंची गाणी, बावनकशी इत्यादी चार महत्वपूर्ण ग्रंथ उपलब्ध आहेत. शाळेशिवाय

ज्ञान नाही विद्या नाही, ते घेण्याची गोडी नाही
बुद्धी असुनी चालत नाही, तयास मानव म्हणावे का?

असे रोखठोक काव्य लिहून समाजाची कानउघाडणी करणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या केवळ वर्गातीलच नाही तर समाजातील लोकशिक्षक झाल्या. या शिवाय त्यांचे विचार फारच प्रगल्भ आणि दिशादर्शक होते. ज्योतीरावांचे निधन झाल्यानंतर दत्तक पुत्राला प्रेताग्नी देण्यास विरोध झाल्यानंतर सर्व रीतीरिवाज झुगारून स्वतः आपल्या पतीच्या सरणाला प्रेताग्नी देण्याचे क्रांतिकारी पाऊल त्यांनी उचलले. असे असतांना पुण्यात भयंकर प्लेगची साथ आली. स्वतःला झोकून देऊन प्लेगग्रस्त लोकांना दवाखान्यात नेण्याचे काम केले. यातच प्लेगची लागण होऊन वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. एका क्रांतिकारी, कृशील, समाज ऋण फेडणाऱ्या महान मातेचा अंत झाला.बंधू-भगिनींनो, आज आपण स्वातंत्र्याच्या शंभरीकडे जातांना काय करत आहोत? आज चळवळी कुठं आहेत? आज शिकेलेली मंडळी काय करत आहे? उच्च शिक्षित स्त्रिया काय वाचत, लिहित, बोलत आहेत? असे एक ना अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे आहेत. तासनतास मोबाईलच्या निर्जीव काचावर बोटं चाळवून थकलेला तरुण वर्ग काय चिंतन करतोय? आयोगावर आयोग घेऊन शिक्षणाची अवस्था काय झाली आहे? असे अनंत प्रश्न आज महान कवयित्री सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी मला सतावत आहेत. मी माझे थेंबे थेंबे काम करतो आहे, आपणही फूल नाही फुलाची पाकळी या नात्याने प्रबोधन, समाज ऋण फेडण्याचे कार्य करावे हीच माफक अपेक्षा! जय क्रांतीज्योती सावित्रीबाई!

**प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये**
**कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ**
**जि. परभणी (महाराष्ट्र)**
**मो.९१५८०६४०६८**

# भाजपच्या 'टीम-८'मध्ये विनोद तावडेंची वर्णी;तावडेंचा समावेश असणारी विशेष समिती ठरवणार भाजपत कुणाला प्रवेश द्यायचा

**मुंबई–**भाजपमध्ये यापुढे कुणालाही थेट प्रवेश मिळणार नाही. कुणाला प्रवेश द्यायचा आणि कुणाला नाही हे ठरवण्यासाठी भाजपने एक विशेष ८ सदस्यीय समिती स्थापन केली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेली ही समिती दुसऱ्या पक्षातील कोणत्या नेत्यांना भाजपत प्रवेश द्यायचा व कोणत्या नेत्यांना नाकारायचा याचा निर्णय घेणार आहे.या समितीत विनोद तावडे यांचा समावेश आहे. त्यामुळे त्यांचे दिल्लीच्या राजकारणातील वाढलेले वजन पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या समितीत तावडेंसह ४ केंद्रीय मंत्री व एका मुख्यमंत्र्यांचा समावेश आहे.भाजपने स्थापन केलेल्या विशेष समितीमुळे (टीम-८) विरोधी पक्षांचे टेन्शन वाढेल असा दावा केला जात आहे. भाजपने बनवलेली ही टीम सपा, बसपा, आरएलडी, जेडीयूसह इतर विरोधी पक्षातील प्रभावशाली नेत्यांना आपल्या पक्षात खेचण्याचा प्रयत्न करेल. भाजपने तयार केलेल्या या टीममध्ये केंद्रीय भूपेंद्र यादव, केंद्रीय मंत्री अश्वनी वैष्णव, केंद्रीय मंत्री मनसूख मंडवियाय आसामचे मुख्यमंत्री हेमंत विश्व शर्मा, सरचिटणीस विनोद तावडे, तरुण चूग आणि सुनिल बन्सल यांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अनुकूल राजकीय काळात अनेक पक्षांमध्ये दुर्लक्षित झालेले किंवा आऊटडेटेड झालेले नेते भाजपच्या वळचणीला येऊन बसू शकतात, पण त्यांचा पक्षाला फायदा होईल की तोटा होईल, हे लक्षात घेऊन ही फिल्टर समिती संबंधित नेत्यांचा भाजप मधला प्रवेश देणे अथवा नाकारणे निश्चित करणार आहे.या समितीच्या अंतर्गत प्रत्येक राज्यात एक समिती बनवली जाणार आहे. ती समिती त्या त्या राज्यात इतर नेत्यांच्या भाजपा पक्षप्रवेश बाबत निर्णय घेणार आहे. त्यामुळे राज्यांमधील समितीतही महत्त्वाच्या नेत्यांचा समावेश होणार आहे. मात्र, ही समिती त्या त्या राज्यातील भाजपच्या मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तयार होईल की भाजपच्या प्रदेशाध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली तयार होईल हे अद्याप निश्चित झालेले नाही.लोकसभा निवडणुकीत भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर इन्कमिंग सुरू होण्याची शक्यता आहे. अनेक राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्षाचे महत्त्वाचे नेते भाजपमध्ये येण्याची शक्यता आहे. अनेक नेत्यांनी तर भापजच्या वरिष्ठ नेत्यांशी संपर्कही साधला आहे. त्यामुळे या नेत्यांचा पक्षात कशा पद्धतीने समावेश करायचा? त्यांना कोणती पदे द्यायची? कोणती जबाबदारी द्यायची? ते कोणत्या भागातील आहेत, त्यांच्या येण्यामुळे पक्षाला किती फायदा होऊ शकतो? आदींचा आढावा घेऊनच ही समिती पुढचा निर्णय घेणार.



# जुलमी कायदे करून जनतेवर अन्याय:केंद्राने . काळे कायदे तातडीने रद्द कराव–विजय वडेट्टीवार

**मुंबई–**वाहन चालकांवर अन्याय करणारा जुलमी, अत्याचारी नवीन मोटार वाहन कायदा केंद्र सरकारने रद्द करावा अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. अशा प्रकारचे जुलमी कायदे आणून सरकार जनतेला वेठीस धरण्याचे काम करत आहे असा हल्लाबोल वडेट्टीवार यांनी केला आहे.ते म्हणाले, ''शेतकऱ्यांसाठी जुलमी कायदे करून ७०० शेतकऱ्यांचा बळी घेणाऱ्या या सरकारने आता चालकांचे आयुष्य उध्वस्त करणारा जुलमी कायदा राज्य सरकारने पारित केला आहे. या नवीन कायद्यानुसार अपघात झाल्यास वाहन चालकास दहा वर्षांची शिक्षा तसेच सात लाख रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. याविरुद्ध संपूर्ण देशभरात चालक रस्त्यावर उतरले आहेत. हा जुलमी कायदा लवकरात लवकर सरकारने रद्द करावा असे वडेट्टीवार म्हणाले.तसेच आमचा या आंदोलनाला पाठिंबा आहे. आज देशभरात इंधनाचा तुटवडा निर्माण झाला आहे. या आंदोलनामुळे ठिकठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. मात्र तरीही सरकारला जाग येत नसेल तर हा सरकारच्या नाकारतेपानाचा कळस आहे. केंद्र सरकार अशा प्रकारचे कायदे आणून जनतेला वेठीस धरण्याचे काम करत आहे. त्याविरोधात अधिकारांसाठी ते रस्त्यावर येत असतील तर त्यांना आमचा पाठिंबा आहे'', असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.तसेच जोपर्यंत हे कायदे रद्द होणार नाहीत, तोपर्यंत चालकांनी आंदोलन सुरू ठेवावे, असा सल्लाही वडेट्टीवारांनी इंधन टँकर चालकांना दिला आहे. दरम्यान, इंधन टँकर चालकांसंदर्भात केंद्राने घातलेल्या जाचक अटींच्या निषेधार्थ पुकारलेल्या संपामुळे राज्यातील पेट्रोलपंपांचा इंधन साठा संपला आहे. यामुळे अनेक ठिकाणी मालवाहतूक



पूर्णपणे ठप्प झाली आहे. या संपामुळे राज्यातील पेट्रोलपंपांवर इंधनाचा तुटवडा निर्माण झाला आहे. चालकांकडून एकत्र येत केंद्र शासनाने नव्याने तयार केलेल्या कायद्याच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत हा निर्णय मागे घेण्याची मागणी केली जात आहे.नव्या मोटार वाहन कायद्यात अपघात झाल्याच्या स्थितीत ट्रक चालकाला जबाबदार धरण्यात येणार आहे. या प्रकरणी त्याला १० वर्षांची शिक्षा व साडे ७ लाखांच्या आर्थिक दंडाला सामोरे जावे लागेल. या तरतुदीला देशभरातील ट्रक व टँकर चालकांनी विरोध केला आहे. हा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी पेट्रोलियम कंपन्यांच्या टँकर चालकांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.केंद्राच्या कथित वादग्रस्त कायद्याला बीपीसीएल, एचपीसीएल व इंडिया ऑयल या तिन्ही सरकारी तेल कंपन्यांच्या टँकर चालकांनी विरोध केला आहे. त्यांनी हा कायदा रद्द करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी त्यांनी घोडबंदर येथील फाऊन्टन हॉटेलजवळ चक्का जाम आंदोलन केले. यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली. या संपामुळे मराठवाड्यासह विदर्भ, खान्देश, उत्तर महाराष्ट्रातील पेट्रोल पंपांमध्ये इंधनाचा साठा संपला आहे.

# ट्रक चालकांच्या भूमिकेला पाठिंबा, राक्षसी कायद्याला विरोध एकतर्फी विचार करून कायदा होऊ शकत नाही–जितेंद्र आव्हाड

**मुंबई–**इंधन टँकर चालकांच्या संपावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला. टँकर चालकांच्या भूमिकेला माझा पूर्ण पाठिंबा असून राक्षसी कायद्याला विरोध असल्याचे आव्हाड म्हणाले. त्यांनी ट्विट करत याबाबत भूमिका मांडली आहे.आव्हाड म्हणाले, केंद्र सरकारने जे कायद्यामध्ये बदल केले आहेत. त्यामध्ये अपघातात जर कोणी मरण पावले तर वाहनचालकाला दहा वर्ष कैद आणि दहा ते पंधरा लाख रूपये दंड, अशी शिफारस करण्यात आली आहे. मूळात अपघात कसा झाला, अपघाताला जबाबदार कोण, याची कुठलीही तपासणी करण्याची तरतूद यामध्ये ठेवलेली नाही. एकतर जेवढ्या



ट्रकचालकांची गरज आहे. त्यापेक्षा ४०% कमी ट्रकचालक भारतात उपलब्ध आहेत. असे जर राक्षसी कायदे करण्यात आले तर कुणीही ट्रकचालक म्हणून काम करण्यास तयार होणार नाही. हाच कायदा पुढे कारचालकांनाही लागू होणार आहे.एखाद्याने चुकीच्या पद्धतीने रस्ता ओलांडला अन् अपघात झाला तर शिक्षा रस्ता ओलांडणाऱ्याला की ट्रकचालकाला द्यायची? सर्व अपघात हे वाहनचालकांच्या चुकीमुळेच होतात, हे म्हणणे कितपत योग्य आहे. म्हणजेच भारतीयांना फक्त जेलचीच भीती दाखवायची, एवढेच काम आता सरकारचे उरले आहे. यात व्यावहारिक दृष्टिकोन ठेवायचाच नाही, ही कुठली पद्धत आहे ? जिथे रस्ता ओलांडायचा नसतो; तिथे रस्ता ओलांडला अन् अपघात झाला तर त्याच्या घरच्यांना दहा लाखांचा दंड आकारणार का? त्याच्या घरच्यांवर ती जबाबदारी टाकणार का?कित्येक वेळा चुकीच्या पद्धतीने रस्ता ओलांडणाऱ्याला वाचवताना अपघात घडतो आणि त्यात चालक दगावतात, याची जबाबदारी कोणावर ? तेव्हा कुठलाही कायदा करताना सर्व बाजूने त्याची तपासणी करून त्याचा अंमल करावा, अशी अपेक्षा असते. एकतर्फी विचार करून कायदा होऊच शकत नाही. ट्रकचालकांनी या कायद्याला विरोध केला आहे. माझा ट्रकचालकांच्या या भूमिकेला पूर्ण पाठिंबा आहे'', असे ट्विट आव्हाड यांनी केले आहे.दरम्यान, हिट अँड रन प्रकरणी कायद्यातील नवीन तरतुदींच्या निषेधार्थ देशभरातील ट्रकचालकांनी वाहन चालविण्यास नकार दिला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी अवजड वाहने रस्त्यावर उभी आहेत. त्यामुळे पेट्रोल, डिझेल, भाजीपाला या जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीवर परिणाम होत आहे.काल रात्रीपासूनच राज्यातील पेट्रोल पंपांबाहेर पट्रोल भरण्यासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दरम्यान, आज सकाळपासूनही राज्यातील पेट्रोल पंपांमधील इंधनाचा साठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. त्यामुळे मालवाहतूक ठप्प झाली आहे. याचा परिणाम राज्यातील दळणवळणावर झाला आहे. इंधनाचा तुटवडा असल्याने स्कुल बस बंद आहेत. त्यामुळे मुलांच्या शेलावर याचा परिणाम झाला.नव्या मोटार वाहन कायद्यात अपघात झाल्याच्या स्थितीत ट्रक चालकाला जबाबदार धरण्यात येणार आहे. या प्रकरणी त्याला १० वर्षांची शिक्षा व साडे ७ लाखांच्या आर्थिक दंडाला सामोरे जावे लागेल. या तरतुदीला देशभरातील ट्रक व टँकर चालकांनी विरोध केला आहे. हा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी पेट्रोलियम कंपन्यांच्या टँकर चालकांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. सोमवारी या प्रकरणी देशभरात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले. मनमाड डेपोतून सोमवारी एकही टँकर बाहेर पडले नाही. यामुळे येथून होणारा इंधनाचा पुरवठा पूर्णतः विस्कळीत झाला आहे. टँकर चालकांचा हा संप मिटला नाही. तर राज्यात पेट्रोल – डिझेलचे वांदे होण्याची शक्यता आहे.केंद्राच्या कथित वादग्रस्त कायद्याला बीपीसीएल, एचपीसीएल व इंडिया ऑयल या तिन्ही सरकारी तेल कंपन्यांच्या टँकर चालकांनी विरोध केला आहे. त्यांनी हा कायदा रद्द करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी त्यांनी घोडबंदर येथील फाऊन्टन हॉटेलजवळ चक्का जाम आंदोलन केले. यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली. टँकर चालकांच्या या संपामुळे मराठवाड्यासह विदर्भ, खान्देश, उत्तर महाराष्ट्रातील पेट्रोल पंप कोरडे ठाक पडण्याची शक्यता आहे.

# शंकरपूर मार्गे चिमूर नागपूर बस सेवा सुरू करा–उपसरपंच अशोक चौधरी

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर शंकरपूर मार्गे नागपूर हा राज्य महामार्ग असून सुद्धा या मार्गाने डायरेक्ट चिमूर वरून नागपूरला जाणारी चिमुर डेपोची एकही बस नसून या रोडवर वसलेल्या अनेक गावातील नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे या राज्य मार्गावर चिमूर डेपो ने पूर्वीप्रमाणे चार ते पाच टाईम मध्ये बस सुरू कराव्यात अशी मागणी शंकरपूर ग्रामपंचायतचे सरपंच अशोक चौधरी यांनी केली आहे

पूर्वी या मार्गाने सकाळी सात वाजता, दुपारी १२:३० वाजता तर सायंकाळी चार वाजता चिमूर वरून नागपूरला जाण्यासाठी बस नियमितपणे चालत होत्या नागपूर वरून येण्यासाठी चिमूर डेपोची शेवटची बस साडेसात वाजता नागपूरवरून सुटत असल्याने नागरिकांना तसेच व्यापाऱ्यांना नागपूरवरून येण्यासाठी सोयीचे होते परंतु कोरोना काळात बस बंद होत्या परंतु त्यानंतर थेट चिमूर वरून नागपूर जाणाऱ्या व नागपूर वरून चिमूर येणाऱ्या एसटीचे टाइमिंग पूर्णपणे बंद केले त्यामुळे



परिसरातील प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.या रोडला चिमूर कान्पा या बस फेऱ्या सुद्धा कमी असल्याने नागरिकांना प्रायव्हेट वाहनाने कान प्यायला जावं लागते व तिथून नागपूर साठी बसची वाट पाहत बसावी लागते त्यामुळे या बसलेल्या पूर्ववत करून या मार्गावरील प्रवाशांना दिलासा द्यावा अशा प्रकारचे लेखी निवेदन चिमूर आगार प्रमुखांना देऊन मागणी केली आहे.

# महाराष्ट्रात इंधनाचा तुटवडा:मुंबईतील २१० पेट्रोलपंप पडणार बंद? इंधन पुरवठा विस्कळीत; पालेभाज्यांचे दरही कडाडण्याची शक्यता

**मुंबई–**केंद्राविरोधात ट्रक–टँकर चालकांनी पुकारलेल्या संपाचे आता संपूर्ण राज्यात पडसाद उमटत आहेत. रात्रीपर्यंत इंधन पुरवठा पूर्ववत न झाल्यास बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील २१० पैकी बहुतांश पेट्रोलपंप कोरडे पडण्यास सुरुवात झाली आहे. पेट्रोल पंप मालक असोसिएशनने ही माहिती दिली आहे.

**१२ जिल्ह्यांतील इंधनपुरवठा ठप्प**

मनमाड लगत असणाऱ्या ३ महत्त्वाच्या तेल कंपन्यांतून दररोज हजारो टँकरद्वारे इंधन पुरवठा केला जातो. येथून जवळपास ७५ लाख लिटर पेट्रोल – डिझेल राज्यभरात पुरवले जाते. पण ट्रक चालकांच्या संपामुळे हा इंधन पुरवठा ठप्प झाला आहे. नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, अकोला, बुलढाणा, नंदुरबार, बीड, औरंगाबाद, जालना, परभणी व नांदेड या जिल्ह्यांना या संपाचा सर्वाधिक फटका बसला आहे.इंधन टँकर चालकांसंदर्भात केंद्राने घातलेल्या जाचक अटींच्या निषेधार्थ पुकारलेल्या संपामुळे राज्यातील पेट्रोलपंपांचा इंधन साठा संपला आहे. यामुळे अनेक ठिकाणी मालवाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. या संपामुळे राज्यातील पेट्रोलपंपांवर इंधनाचा तुटवडा निर्माण झाला आहे. चालकांनी एकत्र येत केंद्र शासनाने नव्याने तयार केलेल्या कायद्याच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत हा निर्णय मागे घेण्याची मागणी केली.त्यानंतर काल रात्रीपासूनच राज्यातील पेट्रोल पंपांबाहेर पट्रोल भरण्यासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दरम्यान, आज सकाळपासूनही राज्यातील पेट्रोल पंपांमधील इंधनाचा साठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. त्यामुळे मालवाहतूक ठप्प झाली आहे. याचा परिणाम राज्यातील



दळणवळणावर झाला आहे. इंधनाचा तुटवडा असल्याने स्कुल बस बंद आहेत. त्यामुळे मुलांच्या शेलावर याचा परिणाम झाला.तर मालवाहतूक बंद असल्याने भाजीपाला महागला आहे. त्यामुळे एकूणच सर्वसामान्यांना या संपाचा पूर्णपणे फटका बसला आहे. तर राज्यातील महामार्गावर वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळत आहे. यामध्ये अनेक ठिकाणी रुग्णवाहिकाही अडकल्याचे चित्र आहे.ट्रकचालक संपाचा परिणाम पेट्रोल आणि डिझेल पुरवठ्यावरही होत आहे. अमरावतीमध्ये पेट्रोल पंपावर लागल्या पहाटे पासूनच वाहनाच्या रांगा लागल्यात. अनेक पेट्रोल पंपावर पेट्रोल उपलब्ध नसल्याने रुग्णवाहिका, स्कूल बस तसेच सर्वसामान्यांवर मोठा परिणाम होत आहे.

**सोलापुरात इंधन टँकर चालकांचा संप मागे**

सोलापूर जिल्ह्यात देखील नवीन वाहतूक कायद्याच्या विरोधात पेट्रोल–डिझेल टँकर चालक आक्रमक होतांना पाहायला मिळत आहे. तर, सोलापुरातील हिंदुस्तान पेट्रोलियम येथील डेपो मधील टँकर चालकांनी संप पुकारला होता. मात्र, पोलिसांनी कायद्यासंदर्भात प्रबोधन केल्याने टँकर चालकांनी संप मागे घेत वाहतूक सुरू केली आहे. तर, वाहतूक सुरु केली असली तरीही कायद्यातील तरतुदींना मात्र वाहन चालकांचा विरोध कायम आहे.

कोल्हापुरात इंधन वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांनी पुकारलेला अखेर रात्री उशिरा मागे घेतला आहे. सरकारच्या वाहतूक धोरणा विरोधात वाहनधारकांनी संपाची घोषणा केली होती. या संपामुळे काल रात्री राज्यभरातील अनेक पेट्रोल पंपावर वाहनधारकांच्या रांगा लागल्या होत्या.राज्यभरातील वाहतूक ठप्प झाल्याने भाजपल्याचे दर कडाडले आहेत.मुंबईहून–गुजरातकडे जाणाऱ्या महामार्गावर पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. ठाणे शहर व जिल्ह्यातील प्रत्येक पेट्रोलपंपाची स्थिती इंधन टँकर चालकांनी आंदोलनाची घोषणा करताच पेट्रोल पंपावर गर्दी झाली होती. शहरातील सर्वच पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. ही परिस्थिती केवळ शहरांमध्येच नाही तर ग्रामीण भागातही दिसून येत होती. संपाच्या काळात कोणतीही अडचण येऊ नये म्हणून लोक टाक्या फुल्ल करत आहेत.

**अपघाताच्या तरतुदीला विरोध**

नव्या मोटार वाहन कायद्यात अपघात झाल्याच्या स्थितीत ट्रक चालकाला जबाबदार धरण्यात येणार आहे. या प्रकरणी त्याला १० वर्षांची शिक्षा व साडे ७ लाखांच्या आर्थिक दंडाला सामोरे जावे लागेल. या तरतुदीला देशभरातील ट्रक व टँकर चालकांनी विरोध केला आहे. हा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी पेट्रोलियम कंपन्यांच्या टँकर चालकांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.सोमवारी या प्रकरणी देशभरात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले. मनमाड डेपोतून सोमवारी एकही टँकर बाहेर पडले नाही. यामुळे येथून होणारा इंधनाचा पुरवठा पूर्णतः विस्कळीत झाला आहे. टँकर चालकांचा हा संप मिटला नाही. तर राज्यात पेट्रोल – डिझेलचे वांदे होण्याची शक्यता आहे.

**तेल कंपन्यांच्या टँकर चालकांचा विरोध**

केंद्राच्या कथित वादग्रस्त कायद्याला बीपीसीएल, एचपीसीएल व इंडिया ऑयल या तिन्ही सरकारी तेल कंपन्यांच्या टँकर चालकांनी विरोध केला आहे. त्यांनी हा कायदा रद्द करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी त्यांनी घोडबंदर येथील फाऊन्टन हॉटेलजवळ चक्का जाम आंदोलन केले. यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली. टँकर चालकांच्या या संपामुळे मराठवाड्यासह विदर्भ, खान्देश, उत्तर महाराष्ट्रातील पेट्रोल पंप कोरडे ठाक पडण्याची शक्यता आहे.

# राज्य मराठी पत्रकार संघाचा अभिष्टचिंतन सोहळा थाटात संपन्न

## पत्रकारांनी निर्भीडपणे समजहितासाठी काम करावे–आ. सुधाकर अडबाले

**भद्रावती । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य अध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून १ जानेवारी रोजी भद्रावती येथे जिल्हा शाखा चंद्रपूर व तालुका शाखा भद्रावती तर्फे अभीष्टचिंतन सोहळा थाटात संपन्न झाला.भद्रावती येथील स्थानिक आशीर्वाद मंगल कार्यालयात सकाळी ११:३० वाजता आयोजित कार्यक्रमाचे उदघाटन शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांचे हस्ते झाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष संपादक तथा राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष निलेश सोमानी हे होते.

यावेळी संघाचे विदर्भ उपाध्यक्ष अनुपकुमार भार्गव, शिक्षण तज्ज्ञ प्रा. नाहिद हुसेन, भा.ज.यु.मो. प्रदेश सचिव करण देवतळे , वरोऱ्याचे माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली, विदर्भ् विभगिय अध्यक्ष प्रा.महेश पानसे .जिल्हा अध्यक्ष जितेंद्र चोरडिया आदी मान्यवर उपस्थित होते.या अभीष्टचिंतन सोहळ्यात दिनदर्शिका प्रकाशन, गुणवंतांचा सत्कार,पदाधिकारी मेळावा, अंध-अपंग विदयार्थी यांना साहित्य वाटप इत्यादी उपक्रम पार पडले. मान्यवरांच्या हस्ते आनंदवन वरोरा येथे व्यवस्थापकिय अधिक्षक पदावर कार्यरत रवींद्र नलगींटवार यांना सामाजिक व नाट्यक्षेत्रातील ,सांस्कृतीक क्षेत्रातील,अपंग सेवेतील बहुआयामी कार्याबद्दल तर प्रणव मशाखेत्रे याची आय.आय.टी येथे निवड झाल्याबद्दल, आंतरराष्टीय कबडडीपटू धिरज पासी यांना क्रिडा क्षेत्रातील योगदानासाठी गुणवंत म्हणून सन्मानित करण्यात आले. राज्य पत्रकार संघाचे जिल्हा सदस्य मनिष रक्षमवार यांना गोसेवा,जनसेवेतील योगदानासाठी सेवारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मान्यवर राज्य प्रमुखांचा वाढदिवस केक कापूनमान्यवरांचे उपस्थितीत संपन्न झाला.आपल्या उदघाटनपर भाषणात शिक्षक आमदार यांनी जनतेचे प्रश्न पुढे आणल्यास हमखास सुटतात हे स्पष्ट करून पत्रकारांचे योगदान अतुलनिय असल्याचे सांगून समाजाला शिक्षीत करण्यासाठी पत्रकार बांधवानी निर्भीडपणे काम करून चौथ्या स्तंभाचा बाणा कायम ठेवावा असे आवाहन केले. राज्य पत्रकार संघातर्फे आ. अडबाले यांचा सत्कार विदर्भ अध्यक्ष निलेश सोमानी, विभागीय अध्यक्ष प्रा.महेश पानसे,विदर्भ उपाध्यक्ष अनुपकुमार भार्गव यांचे हस्ते यावेळी करण्यात आला. ईलेव्हेट समूहाचे संचालक तथा शिक्षण तज्ञ प्रा.नाहिद हुसेन यांचे हस्ते संत गजानन महाराज विद्यालयातील मतिमंद ३१ विद्यार्थ्यांना ब्लँकेट्स वाटप करण्यात आले. या सोहळ्यात जिल्यातील व तालुक्यातील पदाधिकारी, सदस्य उपस्थित झाले होते.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संघाचे जिल्हयातील सर्व तालुका अध्यक्ष व उपस्थित पदाधिकारी यांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांचा वाढदिवस संपूर्ण राज्यात राज्य पत्रकार संघातर्फे साजरा करण्यात येतो. यानिमित्य विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात अशी माहिती यावेळी विभागीय अध्यक्ष प्रा.महेश पानसे यांनी दिली.आपल्या अध्यक्षीय भाषणातून विदर्भ अध्यक्ष निलेश सोमानी यांनी राज्यात पत्रकार संघाचे महत्व व कार्य विषद करून संघटनेने व्यक्ती मोठा होत असल्याचे स्पष्ट केले. या सोहळ्याचे सुंदर संचालन व आभारप्रदर्शन् जिल्हा संघटक रुपचंद धारणे यांनी केले.भद्रावती तालुका अध्यक्ष शंकर बोरघरे, सरचिटणीस शाम चटपल्लीवर, जिल्हा संघटक रुपचंद धारणे व तालुका शाखेचे पदाधिकारी व सदस्य यांच्या पुढाकारातून जिल्हा शाखेच्या मार्गदर्शनात हा सोहळा संपन्न झाला.



## समाजसुधारकांच्या कार्याचे विस्मरण होऊ देऊ नका– बादल बेले

**राजुरा । प्रतिनिधी**

बाल विद्या शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर तथा आदर्श हायस्कुल राजुरा येथे सन्मान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शाळेतच प्रभातफेरी काढून जयघोष करीत सन्मान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी आदर्श प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका नलीनी पिंगे , आदर्श हायस्कुल चे मुख्याध्यापक सारिपुत्र जांभूळकर, राष्ट्रीय हरित सेना विभाग प्रमुख तथा छत्रपती शिवाजी महाराज स्काऊट मास्टर बादल बेले यांची उपस्थिती होती. इयत्ता दहावीची विद्यार्थ्यांनी सरिता गणेश लोहबळे व इयत्ता सहावी ची विद्यार्थ्यांनी संजना संतोष कवलकर यांनी सन्मान दिना विषयी माहिती दिली. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना बादल बेले म्हणाले, सध्याच्या धावपळीच्या युगात आपण आपल्या पूर्वजांनी, समाज सुधारकांनी, क्रांतिकारक, देशभक्तांनी केलेल्या अनमोल अश्या कार्याना विसरत चाललो आहोत. असे न करता आपल्या उज्वल भविष्यासाठी ज्यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन प्राणांची आहुती दिली अश्या महान क्रांतिकारक, समाजसुधारक, देशभक्तांच्या कार्याचे विस्मरण होऊ देऊ नये. वर्षाचा शेवटचा किंवा पहिला दिवस साजरा करण्यापेक्षा ज्यांनी स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून दिली, पुण्यातील भिडेवाडा येथे १ जानेवारी १८४८ रोजी भारतातील पहिली शाळा उघडली तो दिवस सन्मान दिन म्हणून आपण साजरा केला पाहिजेत. महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेवर पुष्पवर्षाव करीत शाळेतच मिरवणूक काढून या दिवसाचे महत्व विषद करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले.




## हिट अँड रन कायदा रद्द करावा संदीप सावरकर यांची मागणी

**वर्धा । प्रतिनिधी**

नुकताच हिट अँड रन कायदा पारित करण्यात आला. परंतु यात काही तरतुदी या अन्यायकारक असून त्यातल्या काही अटी या रद्द करण्यात यावा.अशी मागणी प्रचंड प्रमाणात ड्राइवर, चालक मालक संघटना करत आहे.

अपघात झाल्यानंतर पळून जाणे हे हिट अँड रन समजले जाते. तर आतापर्यंत या प्रकरणामध्ये दोन वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद करण्यात येत होती आणि जामीनही मिळत होता. बदलत्या नव्या नियमानुसार जर कोणी वाहनाला धडक दिली आणि चालक पोलीस प्रशासनाला न सांगता घटनास्थळावरून पळून गेला, तर त्याला १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा आणि दंडही ठोठवला जाणार आहे. या कायद्याला चुकीचे ठरवत देशभरातून आंदोलन केले जात आहे.त्यामुळे हा कायदा रद्द करण्यात यावा हि मागणी संदीप सावरकर, जिल्हाध्यक्ष जय संघर्ष वाहन चालक मालक संघटना व वर्धा जिल्हा समन्वयक(कामगार आघाडी)यांनी केली.व त्या करिता दिनांक ०३ जानेवारी ला वर्धा नागपूर मार्गांवर आंदोलन करण्यात येत असून त्या संदर्भात निवेदन शासनाला जिल्हाधिकारी राहुल कर्डीले व डॉ सागर कवडे, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्फत देण्यात आले आहे.निवेदन देतेवेळी आकाश सुखदेवे, विदर्भ समन्वयक बि आर एस पार्टी सोशल मीडिया सेल , जय संघर्ष संघटना चे शहर अध्यक्ष राहुल कुडे , सुरज लेंडे, अतुल लोणारे, लोकेश शेळके, गुणवंता कटले, रवी मलकापुरे, हरीश भुरे, दिपक गोंडलवार, प्रवीण नांदुरकर, राजू कुऱ्हाडे, हनुमान चौधरी, कुणाल राळेकर, गजानन कोहाड, विनोद राऊत, सुशांत प्रधान, अनिकेत शिंदे, संदीप गोंडलवार,राहुल पंधराम, सचिन कोळसे आणि ईतर कार्यकर्ते उपस्थित होते.



## मूल शहरातील गांधी चौकातील पेट्रोल पंपावर तोबा गर्दी



**मूल । प्रतिनिधी**

शहरातील गांधी चौकातील पेट्रोल पंपावर सकाळी गर्दी पाहायला मिळत होती.पेट्रोल मिळणार नाही या भीतीपोटी पेट्रोल पंपावर गर्दी झाली होती .अन्यायकारक कायदा असल्याचा वाहन चालकांचा आरोप मूल तालूक्यातील ऑटो चालक सुध्दा करीत होते.केंद्र सरकारने नवा मोटारवाहन कायदा तयार केला. हा कायदा अन्यायकारक असल्याचा आरोप करून वाहनचालक संघटनांनी सोमवारी आंदोलन केले. नवीन मोटार वाहन कायद्यानुसार ट्रकमुळे एखादा व्यक्ती जखमी झाल्यास त्याला तत्काळ रुग्णालयात नेले पाहिजे, तसे न केल्यास आणि ट्रकचालक दोषी आढळून आल्यास त्याला सात वर्षांची शिक्षा आणि सात लाख रुपयांच्या दंडाची तरतूद आहे. या तरतुदीला वाहनचालक संघटनांनी विरोध दर्शविला आहे.केंद्र सरकारने आणलेल्या नव्या मोटार वाहन कायद्या विरोधात टँकरचालकांनी संप पुकारत आणलेला नवीन कायदा रद्द करा, अशी मागणी करत बीपीसीएल, एचपीसीएल आणि इंडियन ऑइल या तिन्ही कंपन्यांचे पेट्रोल-डिझेल पुरवठा करणाऱ्या टँकरचालकांनी तीन दिवसीय संप पुकारला आहे.

## कृषिमंत्री धनंजय मुंडे आज चंद्रपुरात

**चंद्रपूर**–राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे आज (दि.३ जानेवारी) चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार, दि.३ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १ वाजता चांदा क्लब मैदान येथे आगमन व जिल्हा कृषी प्रदर्शन उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ४.३० वाजता चंद्रपूर येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

## राजू शेट्टींनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट

**मुंबई**–स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी मंगळवारी ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीत लढण्याचा प्रश्नच येत नसल्याचे स्पष्ट केले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असून पक्ष संघटना आणखी मजबूत करण्यासाठी राजकीय नेते मंडळी कामाला लागले आहे. सध्या आघाडी-महायुतीच्या नेत्यांचा बैठकांचा धडाका सुरु आहे. दोन्हीकडेही लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपासंदर्भात चर्चा सुरु आहेत.

## राज्यस्तरीय मास्टर्स स्पर्धेत मिलिटरी स्कूल च्या प्रा.प्रविण शेळके यांना सुवर्ण व रौप्य पदक

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय इंडीयन मिलिटरी स्कूल येथील इंग्रजी विषयाचे प्रा.प्रविण शेळके यांनी नुकताच नाशिक येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय मास्टर्स स्पर्धेत ४०० मीटर अडथळा प्रकारात सुवर्ण तर ५ किलोमिटर चालणे या प्रकारात रौप्य पदक पटकावले.त्यांची आता १३ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी दरम्यान पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी करिता निवड झाली आहे.

४४ वी मास्टर्स क्रीडा स्पर्धा नुकतीच नाशिक येथे पार पडली.या स्पर्धेत राज्यभरातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील ३० ते १०० वर्ष वयोगटातील जवळपास ७०० स्पर्धकांनी सहभाग घेतला. वर्धा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतांना प्रा.शेळके यांनी सुवर्ण व रौप्य पदक पटकाविले.वर्धा जिल्ह्यातील १८ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेत,वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेवून ४१ पदकांची कमाई केली.विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी व त्याच्या मध्ये फिटनेस बद्दल जाणीव व जागृती व्हावी ,करिता अशा स्पर्धेत मोठ्यांनी सहभाग नोंदविणे काळाची गरज आहे, असे प्रा.शेळके यांनी आवर्जून सांगितले.त्याच्या या यशाबद्दल विद्यालयाचे अध्यक्ष मनोज भेंडे,सचिव कृष्णाभाऊ कडू, कमांडंट के एच पाटील,प्राचार्य रविकिरण भोजने, पर्यवेक्षक नितीन कोठे व इतर शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी वर्गानी त्यांना शुभेच्छा दिल्या..




## 'हिट अँड रन' कायद्याविरोधात जिल्ह्यात विविध ठिकाणी चक्काजाम व आंदोलन

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

नव्या फौजदारी कायद्यात हिट अँड रन प्रकरणी कठोर शिक्षेची तरतूद केल्याच्या निषेधार्थ देशभरातील ट्रक,टँकर सह व्यावसायिक वाहन चालकांकडून आंदोलन करण्यात येत आहे.त्याच पार्श्वभूमीवर दि.(२) मंगळवारी छत्रपती शिवाजी चौक येथे एक तास चक्का जाम करत वाहतूक अडवून धरली.

केंद्र सरकारने नवीन मोटार वाहन कायदा पारित केला.यानुसार अपघातास जबाबदार ट्रकचालकास सात वर्षाची शिक्षा व सात लाख रुपये दंड देखील आकारला जाणार आहे.या कायद्याच्या विरोधात चक्काजाम करत केंद्रसरकारचा निषेध करून तहसीलदार शुभम बहाकर यांना निवेदन देण्यात आले यावेळी सामाजिक कार्यकर्ता शंकर पाल,चालक साईनाथ कोहपरे,मोहन चुदरी,शैलेश गौरकर,एकनाथ चुदरी,माणिक मेश्राम, धीरज मडावी यांच्यासह शेकडो चालक मालक उपस्थित होते.

**चंद्रपूर :**–नवा मोटार वाहन कायदा अन्यायकारक असल्याचा आरोप करीत वाहनचालक संघटनांनी मंगळवार, २ जानेवारी रोजी महानगरातील बंगाली कॅम्प चौकात चक्काजाम आंदोलन केले.

यावेळी त्यांनी चंद्रपूर-मूल, चंद्रपूर-बल्लारपूर मार्ग रोखून धरला. जवळपास चार ते पाच तास या मार्गावरील वाहतूक खोळंबली होती. तिकडे मोठा पोलिस बंदोबस्त कायम होता. नव्या मोटार वाहन कायद्यानुसार वाहनामुळे एखादी व्यक्ती जखमी झाल्यास त्याला तात्काळ रूग्णालयात नेले पाहिजे, तसे न केल्यास आणि ट्रक चालक दोषी आढळून आल्यास त्याला सात वर्षाची शिक्षा आणि सात लाख रूपये दंडाची तरतूद आहे. या तरतुदीला वाहन चालक संघटनांनी विरोध दर्शवला आहे. आंदोलनात टँकर चालकांनीही भाग घेतला आहे. अन्य वाहन चालक-मालक संघटनांही सहभागी झाल्या आहेत. मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना देण्यात आले.

**चिमूर :**–हा कायदा मागे घ्यावा या मागणीसाठी चिमूर क्रांती जिल्हा वाहन चालक संघटनेच्या वतीने मंगळवारी बालाजी मंदिर ते तहसिल कार्यालय पर्यंत मोर्चा काढून सरकारचे लक्ष वेधण्यात आले. तहसील कार्यालय समोर चक्काजाम आंदोलन करण्यात आले. त्यामुळे दोन तास वाहतुक सेवा विस्कळीत झाली होती.

**कोरपना :**–येथील बसस्थानक परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहन चालक-मालक संघटनेने चक्काजाम आंदोलन केले. यामुळे राजुरा-आदिलाबाद व वणी मार्गावरील वाहतूक खोळंबली होती.

**नागभीड :**–येथेही वाहन चालक-मालक संघटनेने आंदोलन करून शासनाचा निषेध नोंदवला. मागण्यांचे निवेदन राज्याचे विरोधी पक्षनेता आ. विजय वडेट्टीवार यांना दिले. यावेळी नागभीड तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रमोद चौधरी, विधानसभा काँग्रेस संयोजक विनोद बोरकर आदी उपस्थित होते.



### जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा तुटवडा भासणार नाही : परदेशी

**जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा तुटवडा भासणार नाही. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी मंगळवारी केले आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातील मंथन सभागृहात इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे प्लाँटचे व्यवस्थापक, डेपो व्यवस्थापक, कन्सुमर सेल्स व्यवस्थापक, डेपो प्रभारी अधिकारी, हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, पेट्रोल डिलर्स असोसिएशन अध्यक्ष, पेट्रोल-डिझेल पुरवठा करणारे टॉन्सपोटर्स, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळचे अधिकारी आदींची उपस्थिती होती.**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .